सज्जन व्यक्ती वाद टाळते. वाद घालणारी व्यक्ती सज्जन असू शकत नाही.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार २९ एप्रिल २०२५ | अंक १३८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# इस्त्रायल, इराणनंतर आता फ्रान्सचीही एन्ट्री
# पाकिस्तानवर महासंकट, समुद्रातूनही होणार हल्ला



जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. भारताने पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी केल्याने पाकिस्तानमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. एवढेच नव्हे तर भारताने पाकिस्तानचं पाणीच तोडल्याने त्याचा थेट परिणाम पाकिस्तानातील 17 कोटी लोकांवर होणार आहे. त्यामुळेही पाकच्या तोंडचं पाणी पळालं आहे. दुसरीकडे अमेरिका, इराण आणि इस्त्रायलने भारताला सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. आता यात आणखी एका देशाची एन्ट्री झाली आहे. तो म्हणजे फ्रान्स. भारत आणि फ्रान्स दरम्यान 26 राफेल मरीन विमानांची डील झाली आहे. 63,000 कोटी रुपयांची ही डील झाली आहे. त्यामुळे पाकिस्तानला कापरं भरलं आहे. भारत आणि फ्रान्समध्ये झालेल्या डीलनुसार भारतीय नौदलासाठी फ्रान्सकडून 26 राफेल मरीन एअरक्राफ्ट खरेदी केले जाणार आहेत. भारताचे प्रतिनिधी आणि संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी हा सौदा केला आहे. यावेळी नौदलाचे उपप्रमुख व्हाइस ॲडमिरल के. स्वामिनाथन उपस्थित होते. भारत आणि फ्रान्समध्ये झालेल्या करारानुसार 22 सिंगल-सीट आणि 4 ट्विन-सीट विमान सामिल होणार आहेत. यामुळे पाकिस्तानला मोठा झटका बसणार आहे. कारण हे जेट आयएनएस विक्रांतवर तैनात केले जाणार आहेत. 1971 च्या युद्धात भारतीय नौदलाने पाकिस्तानला आस्मान दाखवलं होतं. या जेटमुळे आता भारतीय नौदलाची ताकद वाढणार आहे. भारत आणि फ्रान्स दरम्यान 2016मध्ये डील झाली होती. त्यानुसार आधीपासूनच भारतीय नौदलाच्या ताफ्यात 36 एअरक्राफ्ट आहेत. भारतीय हवाई दलाच्या राफेल जेट अंबाला आणि हाशिनारा या दोन बेसवरून ते ऑपरेट होतील. या 26 राफेल-M च्या डीलसोबतच भारताच्या राफेल जेटची संख्या वाढून 62 होणार आहे. कसा आहे Rafale-M फायटर जेट? Rafale-M एक मल्टीरोल फायटर जेट आहे. त्याचा AESA राडार टारगेट डिटेक्शन आणि ट्रॅकिंगसाठी उत्तम आहे. यात स्पेक्ट्रा इलेक्ट्रॉनिक वॉरफेयर सिस्टिम आहे, ती स्टेल्थ बनवते. यात हवेतच इंधन भरता येते, म्हणजेच याची रेंज वाढू शकते. राफेल-एम फायटर आल्याने भारतीय समुद्री क्षेत्रात नजर ठेवणे, गुप्तचर मोहीम राबवणे आणि हल्ले करणे अशा अनेक मोहिमा शक्य होतील. हा फायटर जेट अँटी-शिप वॉरफेअरसाठी सर्वोत्तम आहे. यात प्रिसिजन गाइडेड बॉम्ब आणि क्षेपणास्त्रे बसवता येतात, जसे की मेटियोर, स्काल्प किंवा एक्सोसैट. या फायटर जेटच्या आगमनामुळे आकाश, समुद्र आणि जमीन — तिन्ही ठिकाणी संरक्षण मिळेल. नौदल देशाच्या चहुबाजूंना अदृश्य कवच तयार करू शकेल.

## माऊली दादांची समाधी ही संजीवनी आहे बाळासाहेब महाराज गाडे यांचे प्रतिपादन..!
## माऊली दादा म्हणजे ज्ञानेश्वर माऊली आहेत ; विष्णूचा अवतार आहेत..

बीड प्रतिनिधी - माऊली दादांना बाळनाथ महाराजांचे दर्शन झाले तेव्हा दादांच्या जीवनातले कोडे सुटले. माऊली दादा म्हणजे ज्ञानेश्वर माऊली आहेत. विष्णूचा अवतार आहेत, चाकरवाडी चे माऊली म्हणजे आळंदीचे माऊली आहे. तप केले की त्याचे फळ प्राप्त होते. ज्या दिवशी आपल्या जीवनात श्री गुरु घडेल त्या दिवशी दारिद्रय चे दुखः संपते. विसाव्या शतकातील महान संत विभूती वै. ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकर वाडीकर यांच्या कृपा आशीर्वादाने व श्री . ह. भ प तपोनिधी शंतिब्रम्ह महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताहाची तिसऱ्या दिवसाची किर्तन सेवा श्री.ह. भ. प बाळासाहेब महाराज गाडे जामखेड यांचे सुश्राव्य असे तिसऱ्या दिवसाची किर्तन सेवा संपन्न झाली. महाराजांनी अतिशय चांगल्या प्रकारे अभंग सोडवून भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. महाराजांनी आपल्या वाणीतून भाविकांना संतांची सेवा करून सुखी आनंदी रहा असा संदेश दिला. महाराजांनी श्रीगुरुसारिखा असतां पाठीराखा । इतरांचा लेखा कोण करी ॥ राजयाची कांता काय भीक मागे ।मनाचिया जोगे सिध्दि पावे ॥



कल्पतरुतळवटीं जो कोणी बैसला । काय वाणी त्याला सांगिजोजी ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों । आतां उध्दरलों गुरुकृपें ॥ या अभंगावरती चिंतन केले. जीवब्रह्मैक्य ज्ञानदान करण्यामध्ये ईश्वरापेक्षा अत्यंत श्रेष्ठ अशा श्रीगुरूचा पाठिंबा असेल तर इतर ज्या रिद्धिसिद्धी किंवा संसारिक सुखे यांची पर्वा कोण करील. मनाप्रमाणे सर्व ऐश्वर्य भोगण्यास मिळणाऱ्या राजाच्या बायकोला भीक मागावयाला जाण्याची पाळी येईल काय? किंवा कल्पतरूखाली बसलेल्या पुरूषास काय कमी आहे. श्रीगुरू निवृत्तिरायांच्या कृपेने माझा उद्धार झाला म्हणून मी संसार समुद्रांतून पार पडलो. असे माऊली ज्ञानदेव सांगतात. महाराज सांगतात दादांची समाधी ही संजीवनी आहे तसे पाहिले तर आळंदीच्या माऊलींची, चाकर वाडींच्या माऊलींची, बाळनाथ महाराज यांची समाधी ही संजीवनी आहे. जो या चाकरवाडी मधे येईल दादांचे नामस्मरण करेल माऊली माऊली नामस्मरण करेल आणि या ठिकाणचा महाप्रसाद घेईल त्याला कल्पवृक्ष सारखे पुण्य प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही. जो देवाचे नाव आवडीने घेईल त्याला कशाचीच चिंता करायची गरज नाही. संत हे कामधेनू आहे, संत हे परीस आहेत. सदगुरू हे खूप मोठे आहेत, परीस पेक्षा सद्गुरू मोठे आहेत. महाराजांनी त्यांच्या गोड वाणीतून भाविक भक्तांना गोड असा संदेश दिला. गोड अश्या अभंगातून भाविक भक्त किर्तन एकूण भारावून गेले. आणि गोड वाणीतून भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. गायनाचार्य - पिंपळे महाराज , रोडे महाराज, रज्जाक महाराज, हरीभाऊ महाराज काळे , हनुमंत महाराज घोलप, मृदंगाचार्य - अविष्कार महाराज क्षीरसागर, त्रिंबक महाराज शेळके तसेच यावेळी चाकरवाडीचे आदर्श पोलिस पाटील नानासाहेब काकडे, पत्रकार अभिजीत पवार, बाबासाहेब मोरे, मंचीक पवार ,तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त आणि महाराज मंडळी तसेच मोठया प्रमाणात ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

## पिकअपच्या धडकेत महिलेचा मृत्यू

खर्डा : शिर्डी-हैदराबाद राज्य महामार्गावर सकाळी व्यायामासाठी फिरत असताना भरधाव पिकअपने दोन महिलांना धडक दिली. त्यात एकीचा मृत्यू झाला तर दुसरी महिला गंभीर जखमी आहे. या अपघातात स्मिता दिलीप ऊर्फ ईश्वर रणभोर (वय ६०) यांचा मृत्यू झाला.



रविवारी सकाळी स्मिता रणभोर व वर्षा दिंडोरे मॉर्निंग वॉक करून घराकडे माघारी येत असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. यामध्ये रणभोर या मयत झाल्या तर वर्षा प्रकाश दिंडोरे (वय ५८) या गंभीर जखमी झाल्या. त्यांना अहिल्यानगरमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याबाबत खर्डा पोलिस स्टेशन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. खर्डा पोलिसांनी केलेल्या तपासात पिकअप सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. त्या पिकअप चालकाला मिरजगाव येथून गाडीसह ताब्यात घेतले आहे. दरम्यान मयत रणभोर यांचे जामखेड येथील शासकीय रुग्णालयात शिवविच्छेदन करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. मयत स्मिता रणभोर अतिशय कष्टाळू महिला म्हणून ओळखले जात होत्या. त्यांचा टेलरिंगचा व्यवसाय होता. त्यांच्या निधनाने खर्डा शहरावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

## माजलगाव मध्ये भव्यदिव्य आध्यात्मिक बालसंस्कार शिबिराचे आयोजन, ह भ प गोविंद महाराज सुरवसे

बीड प्रतिनिधी. माजलगाव शहरात भव्य दिव्य बालसंस्कार शिबिराचे आयोजन, आदर्श देवगाव नगरीचे भूमिपुत्र ह,भ,प, गोविंद महाराज सुरवसे यांनी आयोजित केले आहे, सदरील शिबिर 2.मे ला चालू होणार आहे व शिबिर कालावधी वीस दिवसाच असणार आहे, या शिबिरामध्ये वारकरी संप्रदायातील विषय शिकवले जाणार आहेत, यामध्ये हनुमान चालीसा, हरिपाठ, पखवाज भगवद्गीता, वारकरी पावल्या, व्याख्यान, वारकरी चाली योगासने, संत कथा, इत्यादी विषय शिकवले जाणार आहेत, या शिबिराला विशेष सहकार्य राजकीय सामाजिक शैक्षणिक शेतकरी बांधवानी केलेला आहे, दि, 20.05.2025. रोजी सकाळी नऊ ते अकरा बाबा महाराज राऊत यांचे काल्याचे किर्तन होईल सदरील कार्यक्रम, माऊली गुरुकुल जुन्या पूर्णवादी बँकेजवळ शाहूनगर माजलगाव परिसरात होईल, तरी या शिबिराच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आव्हान आयोजक भागवताचार्य ह ,भ ,प गोविंद महाराज सुरवसे, 8888053917. याप्रमाणे संपर्काद्वारे आव्हान यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गरजू लाभार्थींना सेल्फ किंवा ग्रामविकास अधिकाऱ्यांमार्फत सर्व्हे पूर्ण करून घेण्याचे देवगाव येथील सरपंच सौ.रुपालीताई अतुल मुंडे यांचे आवाहन

केज/प्रतिनिधी:- प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभमिळवून देण्यासाठी ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या मार्फत किंवा स्वतःच्या माध्यमातून सर्वे करण्याचे काम सुरू असून याची



मुदत येते ३० एप्रिल रोजी संपणार असल्याने गरजू व पात्र असलेल्या लाभार्थ्यांनी घरकुलासाठी स्वतः ॲपवरून किंवा ग्रामसेवकाच्या मार्फत आपला सर्वे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन देवगावच्या सरपंच सौ.रुपालीताई अतुल मुंडे यांनी केले आहे. याआधीही जि.प.सदस्य विजयकांत भैय्या मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली देवगाव ग्रामपंचायतच्या वतीने रमाई आवास सह विविध योजनेतून विक्रमी घरकुले मंजूर करून दिलेली आहेत.

# प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे बेमुदत उपोषण सुरु
# गणित व विज्ञान विषयामध्ये रुपांतरण करण्याची मागणी

बीड: भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ प्राथिमक शिक्षकांना गणित व विज्ञान विषयामध्ये रुपांतरण करण्यात यावे या मागणीसाठी जिह्लाधिकारी कार्यालयासमोर प्राथमिक पदवीधर शिक्षकांनी बेमुदत उपोषण सुरु केले आहे. जिह्ला परिषदेत प्राथमिक पदवीधर पदावर कार्यरत असलेल्या भाषा व सामाजिक शास्त्र विषयाचे शिक्षक हे गेल्या आठ

## न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष

आठ महिन्यापासून हा प्रश्न प्रलंबित असल्याने संबंधित शिक्षकांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यावर ३ मे रोजी सुनावणी झाली. दोन आठवड्यात जिल्हा परिषद प्रशासनाने शिक्षक संचालकांच्या मार्गदर्शनानुसार हा विषय बदल करुन देण्याबाबत आदेशीत केले होते. मात्र जिल्हा परिषद प्रशासनाने या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. त्यामुळे २८ एप्रिल पासून बेमुदत आंदोलनाचा निर्णय घेतला असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

महिन्यांपासून गणित व विज्ञान विषयात समावेश करावा अशी मागणी सातत्याने करीत आहेत. त्या संबंधिचे प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत जिह्ला परिषदेकडे ९ महिन्यांपूर्वी दाखल केले आहेत. बीड जिह्ला परिषदेत भाषा व सामाजिक शास्त्र विषयाचे शिक्षक अतिरिक्त आहेत तर दुसऱ्या बाजुला गणित व




विज्ञान विषयाच्या जवळपास ४०० पेक्षा जास्त जागा शिल्लक आहेत. त्यामुळे गणित व विज्ञान या विषयासाठी शिक्षक उपलब्ध व्हावेत व अतिरिक्त शिक्षकांचे प्रमाण कमी व्हावे या हेतून शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ही मागणी केली असल्याचे शिक्षकांनी



सांगितले. आंदोलनात विकास गवते, दिलीप सानप, जितेंद्र सांगळे, निलेश चव्हाण, ए. एन. सानप, आर.ए. व्हावळ, ए.जे. कोकाटे, एम.आर. घोडके, आनंद आळणे, एस. एस. पांडुळे, आर.पी. साळुंके, एस.के. भांडरे यांच्यासह इतर सहभागी आहेत. बळीराम गवते यांनी दिली भेट शिक्षकांच्या आंदोलनास राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बळीराम गवते यांनी भेट देऊन शिक्षकांसोबत चर्चा केली. ही समस्या निकाली काढण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २९ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

# सिंधू जलवाटप करार स्थगित

किस्तानबरोबरील चार युद्धांनंतरही गेल्या सहा दशकांहून अधिक काळ टिकून राहिलेला सिंधू जलवाटप करार स्थगित करून त्या देशाला कोंडीत पकडण्यासाठीचे पाऊल भारताने टाकले आहे. पहलगाममध्ये पर्यटकांना क्रू रपणे लक्ष्य करणाऱ्या दहशतवादी हल्ल्यानंतर, हे कारस्थान रचणाऱ्या पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्याची भावना देशभर व्यक्त होत असताना भारताने सुरुवातीच्या टप्प्यात घेतलेले निर्णय इस्लामाबादला रोखठोक संदेश देणारे आहेत. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांनी गेल्या आठवड्यात भारताच्या विरोधात गरळ ओकताना काश्मीरचा ङ्गदुखरी नसफ असा उल्लेख केला होता. मेंदू आणि हृदय यांच्यातील रक्तपुरवठा करणाऱ्या शीरेला ङ्गजग्युलर व्हेनफ म्हणतात. काश्मीर ही पाकिस्तानसाठी अशाच प्रकारची शीर आहे, असा मुद्दा महंमद अली जीना यांच्या काळापासून मांडला जातो. काश्मीरमधून पाकिस्तानात वाहणाऱ्या नद्यांचा संदर्भही याला आहे. सिंधू, झेलम, चिनाब या नद्या भारतातून पाकिस्तानात जातात आणि त्यामुळे पाकिस्तानातील नद्यांमधील प्रवाहाचे नियंत्रण एक प्रकारे भारताकडे आहे. पाकिस्तानला काश्मीर हवा आहे, तो याही कारणामुळे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानच्या विरोधातील पहिल्या कारवाईत भारताने या ङ्गदुखऱ्या नसेफ्वर पाय ठेवून योग्य इशारा दिला आहे. सिंधू नदीचे आपल्या वाट्याचे पाणी रोखण्याचे कोणतेही कृत्य म्हणजे युद्धच असल्याची पाकिस्तानने त्यानंतर दिलेली धमकीवजा प्रतिक्रिया भारताच्या कारवाईतील तीव्रता अधोरेखित करणारी आहे. १९६०मधील हा करार पाकिस्तानला झुकते माप देणारा असून, यापूर्वीच भारताने अशा प्रकारचे पाऊल उचलायला हवे होते; परंतु उशिराने का होईना हा निर्णय घेतला ते योग्यच झाले. सिंधू जलवाटप करार स्थगित केल्याने लगेचच पाकिस्तानची जलकोंडी होईल असे नाही. मात्र, या कराराला भारत आता बांधील नसेल आणि या करारातील नद्यांवर भारतात असलेल्या प्रकल्पांवर पाकिस्तान देखरेख करू शकणार नाही. या करारानुसार, रावी, बियास आणि सतलज या नद्यांचे पाणी भारताला, तर सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांचे ८० टक्के पाणी पाकिस्तानला मिळते; शिवाय या नद्यांचे पाणी भारत अडवू शकत नाही. जलविद्युत प्रकल्प मात्र राबवू शकतो. करारातील या अटींमुळे या नद्यांचे पाणी अडविण्यासाठीचे प्रकल्प राबविले गेले नाहीत. ते आता भारत करू शकेल. या तिन्ही नद्या पाकिस्तानसाठी मुख्य वाहिन्याच आहेत. तेथील ६५ टक्के शेतजमिनीचे सिंचन या नद्यांमुळे झालेले आहे. त्यामुळे हे पाणी रोखल्यास तिथे संकट येऊ शकते. भारतविरोध आणि इस्लाम यांतच आपले अस्तित्व शोधणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी त्याची कोंडी करण्याची नीतीच उपयुक्त ठरते. गेल्या काही वर्षांपासून पाकिस्तानला सर्व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर एकटे पाडण्याचे धोरण भारताने अवलंबले असून, त्याला काही प्रमाणात यशही आले आहे. हे धोरणही जोरकसपणे पुढे राबवावे लागेल. सिंधू करार रद्द करण्याबरोबरच व्हिसा न देण्यापासून उच्चायुक्तालयातील संरक्षण सल्लागारांना देश सोडून जाण्यास सांगण्यापर्यंतची पावले उचलली गेली आहेत. भारताच्या या कारवाईनंतर पाकिस्तानने सिमला कराराला स्थगिती देण्याचे पाऊल उचलले आहे. त्याचबरोबर व्यापार थांबविण्याबरोबर वाघा सीमा बंद करण्याचा निर्णयही घेतला आहे. या निर्णयांमुळे भारताला प्रत्युत्तर दिल्याचे खोटे समाधान पाकिस्तानला मिळेलही; परंतु याचा फटका त्यालाच अधिक बसणार आहे. पाकिस्तान एका मोठ्या संकटाचा सामना सध्या करीत आहे. बलुचिस्तान, खैबर पख्तुनख्वा आणि सिंध या तिन्ही प्रांतांत फुटीरतावाद्यांनी तेथील सुरक्षा व्यवस्थेला मोठे आव्हान दिले आहे. पाकिस्तानी लष्कर आणि पोलिस यांनाच ते प्राधान्याने लक्ष्य करीत आहेत. अफगाणिस्तानातील तालिबानीही पाकिस्तानच्या विरोधात आहेत. दुसरीकडे पाकिस्तानातील आर्थिक संकट मोठ` आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे अनेकदा खेटे घातल्यानंतर मदत मिळाल्यानेच तो दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन तग धरू शकला आहे. मात्र, ती वेळ कधीही येऊ शकते. अफगाणिस्तानातून अमेरिकेने माघार घेतल्यानंतर पाकिस्तानचे सामरिक महत्त्वही कमी झाले आहे. अशा स्थितीत देशांतर्गत जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी भारतविरोधी कारवायाचा हातखंडा खेळ पाकिस्तानने पुन्हा आरंभलेला दिसतो. पाकिस्तानचा सु ंभ जळाला तरी पीळ कायम असल्याचे यातून दिसते; परंतु योग्य ठिकाणी त्याची नस दाबण्याची आवश्यकता आहे. पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना शोधून टिपणार आणि बळींना न्याय देणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटले आहे.

# सद्गुरु श्री मिस्कीन स्वामी संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त सर्वधर्मियांचे रक्तदान

## माजलगाव मठाचा आदर्श पायंडा; सामाजिक सलोख्याचे माजलगावात दर्शन

माजलगाव : येथील प्रसिद्ध श्री सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थान नेहमीच सामाजिक सलोख्याला प्राधान्यक्रम देत आहे. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त सर्वधर्मीय रक्तदात्यांनी सहभाग घेऊन सामाजिक सलोख्याचा आदर्श पायंडा पाडला आहे. धर्माच्या पलीकडे माणुसकीचे दर्शन घडविले, याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दरम्यान, मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी सामाजिक सलोखा जपण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. माजलगावातील सद्गुरू श्री मिस्किन स्वामी मठ संस्थानमध्ये वर्षभर आयोजित होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये आता आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्याचा निर्णय मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी घेतला. रविवार, दि.२७ एप्रिल रोजी माजलगाव मठात श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी हा संकल्प केला. यामुळे माजलगाव मठामध्ये आता धार्मिक कार्यक्रमातून



मनाचे आरोग्य जपतानाच भाविकांच्या, शिष्यांच्या शरिराच्या आरोग्याची माहिती होण्यासाठी प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात आरोग्य तपासणी केली जाणार आहे. वीरशैव लिंगायत समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या माजलगाव येथील सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थानमध्ये श्री सद्गुरु मिस्किन स्वामी यांचा जयंती रविवारी विविध धर्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सकाळी आठ वाजता रजत पालखी सोहळा काढण्यात आला. यामध्ये श्री मिस्किन स्वामी यांची चांदीची मूर्ती पालखीमध्ये ठेवून रजत पालखी मठ, देवी मंदिर ते सिंदफणा नदीपर्यंत काढण्यात आली. नदीपात्रात श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत चांदीच्या मुर्तीला जलाभिषेक घालण्यात आला. पालखीत सहभागी महिलांनी नदीतील जल कलशात घेऊन रजत पालखी



नदीपात्र ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, हनुमान मंदिर मार्गे माजलगावकर मठात रजत पालखीचा समारोप झाला. यानंतर नदीपात्रातील जलाने श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या समाधीस लघुरुद्राभिषक घालण्यात आला. यानंतर श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आशीवर्चन लाभले. श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या जन्मोत्सवानिमित्त यंदा माजलगावकर मठात रक्तदान व नेत्रतपासणी शिबिर घेण्यात आले. शेवटी भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमास माजलगावसह बीड, गेवराई, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर येथील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री सद्गुरू मिस्किन स्वामी जयंती उत्सवासाठी माजलगाव येथील वीरशैव समाज तसेच युवकांनी मोठे परिश्रम घेतले ४९ जणांचे रक्तदान तर १४० जणांची नेत्र तपासणी धार्मिक कार्यक्रमातून मनाचे आरोग्य जपण्याच्या उद्देशाने यंदा श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या संकल्पनेतून जयंती उत्सवानिमित्त माजलगावकर मठात प्रथमच रक्तदान शिबिर व नेत्रतपासणी करण्यात आली. माजलगाव मठ संस्थान आणि माजलगाव ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित रक्तदान शिबिरात ४९ जणांनी रक्तदान केले तर आनंदऋषी हॉस्पिटल आणि मठाच्या वतीने घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिराचा १४० जणांनी लाभ घेतला. यातील ५० नागरिकांमध्ये डोळ्यांचे दोष आढळून आले. त्यांच्यावर आठ दिवसात आनंदऋषी हॉस्पिटल अहिल्यानगर येथे मोफत ऑपरेशन व उपचार केले जाणार आहेत.

**'मठातर्फे वर्षभर आरोग्य शिबिरे घेणार'**

आरोग्य हा विषय समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. माजलगाव मठातर्फे भविष्यकाळात आरोग्य विषयक उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. वर्षभर आरोग्य शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर असे लोकोपयोगी उपक्रम राबविण्यावर मठाचा भर असेल, अशी माहिती मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.

# अखेर कला केंद्र प्रकरण भोवले रत्नाकर शिंदे यांची जिल्हाप्रमुख पदावरुन हकालपट्टी

------------------------------

पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी केज तालुक्यातील महालक्ष्मी कला केंद्रावर छापा टाकला होता. बाहेरून कला केंद्र दिसत असले तरी, आतमध्ये मोठ्या प्रमाणात वेश्या व्यवसाय चालत असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी घटनास्थळावरून अनेक महिलांची सुटका केली, ज्यामुळे या केंद्राच्या आड दडलेल्या गैरकृत्यांचा पर्दाफाश झाला.या गंभीर प्रकरणात शिवसेना ठाकरे गटाचे जिह्लाप्रमुख रत्नाकर शिंदे यांचे नाव जोडले गेल्याने प्रसारमाध्यमांनी या बातमीला मोठे महत्त्व दिले. वृत्तवाहिन्या आणि



वृत्तपत्रांमध्ये यासंबंधीच्या बातम्या झळकल्यानंतर, पक्षाची प्रतिमा मलिन झाली. याची गंभीर दखल घेत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कोणतीही दिरंगाई न करता रत्नाकर शिंदे यांना जिह्लाप्रमुख पदावरून केले. शिंदे निलंबित यांच्या हकालपट्टीनंतर बीड जिल्ह्यातील राजकीय समीक्षकांमध्ये आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये अनेक प्रश्न उभे राहिले

आहेत. आता जिह्लाप्रमुख पदाची जबाबदारी कोणाला मिळणार, याबद्दल जोरदार चर्चा सुरू आहे. अनेकजण स्वच्छ आणि निष्ठावान नेते म्हणून ओळखले जाणारे परमेश्वर सातपुते यांचे नाव घेत आहेत. यापूर्वीही त्यांनी पक्षासाठी महत्त्वपूर्ण काम केले आहे, त्यामुळे पुन्हा एकदा त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेमुळे ठाकरे गटाच्या संघटनेतमोठे बदल होण्याची शक्यता कार्यकर्त्यांमध्ये आहे. नाराजी आणि आश्चर्य व्यक्त होत आहे. आगामी काळात पक्षाला नव्याने बांधणी करावी लागणार आहे, हे स्पष्ट दिसत आहे. बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण या घडामोडींमुळे चांगलेच तापले आहे आणि आता सर्वांचे लक्ष याकडे लागले आहे की, ठाकरे गट पुढील रणनीती काय ठरवते

# महामानवाला विविध उपक्रमातून अभिवादन तर शितलताईच्या शाहिरी जलसाला कुसळंबकरांचा प्रतिसाद!

## कुसळंब येथे डॉ. बाबासाहेबांच्या जयंती निमित्त उपक्रमाची रेलचेल

कुसळंब | प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 26 एप्रिल रोजी विविध प्रबोधन पर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला कुसळंबसह पाठवता तालुक्यातून नागरिकांनी उपस्थिती लावली होती.. कुसळंब येथे 26 एप्रिल रोजी आयोजित भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये महाआरोग्य शिबिर रक्तदान शिबिर तसेच संध्याकाळी प्रबोधनकार शाहीर शितलताई साठे यांचा शाहिरी जलसा देखील आयोजित करण्यात आला होता. रक्तदान शिबिराला नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला तर कुसळणकरांनी आरोग्य शिबिरात सहभाग नोंदवत बाबासाहेबांना अभिवादन केले. तसेच संध्याकाळी शाहिरी जलसा कार्यक्रम पाहण्यासाठी कुसळंब करांनी उदंड प्रतिसाद दिला. शाहीर शितलताई साठे यांनी शाहिरीतून प्रबोधनाचे धडे देत कुसळंबकरांची मन जिंकली. यावेळी दिव्य वास्तव लोक वास्तव परिवाराकडून शितलताई साठे यांना माँसाहेब जिजाऊ व छत्रपती शिवरायांची जिजाऊ वंदना असलेली प्रतिमा भेट देऊन स्वागत केले. या स्वागताचे शितलताई कडून कौतुक आणि आभारही व्यक्त करण्यात आले.. आलेल्या मान्यवरांचे भीम जयंती उत्सव समिती कडून आभार व्यक्त करण्यात आले..

आरोग्य, रक्तदान शिबिराला तसेच शाहिरी जलसा कार्यक्रमाला कुसळंबकरांचा मोठा प्रतिसाद महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराला



उसळमसह परिसरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दर्शवला तसेच संध्याकाळी शाहीर प्रबोधनकार शितलताई साठे यांच्या कार्यक्रमाला देखील कुसळंबकरांसह परिसरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला..

दिव्य वास्तव व लोकवास्तव परिवाराकडून शितलताईंच स्वागत

कुसळंब येथे प्रथमच प्रबोधनकार शाहीर शितलताई साठे यांचं आगमन झाल्याने त्यांचं दिव्य वास्तव व लोक वास्तव परिवाराच्यावतीने प्रा.सचिन पवार यांनी माँसाहेब जिजाऊ व छत्रपती शिवराय यांची प्रतिमा भेट देऊन स्वागत केले..

सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार यांच्याकडून शितलताईंचे कौटुंबिक स्वागत

प्रबोधनकार शाहीर शितलताई साठे सह सचिन माळी यांच कुसळंब येथे कार्यक्रमासाठी आगमन झाले असता सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार यांनी दोघांचाही शाल श्रीफळ सह पोशाख व कुलदैवत खंडोबाची प्रतिमा भेट देऊन कौटुंबिक सत्कार केला...

# रील बनवताना तरुणाने केलं चुकीच्या पद्धतीने स्पर्श,



गेल्या काही महिन्यांपासून महिलांसोबत गैरवर्तवणूक होण्याच्या घटनेत सातत्याने वाढ होत आहे. त्यात आता एका प्रसिद्ध सोशल मिडिया इन्फ्लुएन्सरचा विनयभंग झाल्याची घटना घडली आहे. यावेळी तिने त्या मुलाला चांगलाच धडा शिकवला. तिने याचा एक व्हिडीओ तिने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. या व्हिडीओवर अनेक कलाकारांनी प्रतिक्रिया देत तिचे कौतुक केले आहे. नेमकं काय घडलं? सोशल मीडिया इन्फ्लुएंसर मानसी सुरवसे ही नेहमी इन्स्टाग्रामवर विविध व्हिडीओ पोस्ट करत असते. नुकतंच ती तिच्या सोसायटीतील एका इमारतीच्या जिन्यावर उभी राहून रील शूट करत होती. यावेळी तिने लाल रंगाचा टॉप आणि पांढऱ्या रंगाचा स्कर्ट घातला होता. यावेळी तिने समोर मोबाईल कॅमेरा चालू ठेवून व्हिडीओ शूटींग सुरु ठेवले. यात ही संपूर्ण घटना कैद झाली. मानसी ही जिन्यावर उभी असताना गुलाबी रंगाची टीशर्ट आणि जिन्स घातलेला मुलगा तिथून जातो. त्या तरुणाला पाहून मानसी ही बाजूला होऊन त्याला जाण्यासाठी रस्ता देते. पण तो तरुण मानसीला एकटी समजून चुकीच्या पद्धतीने स्पर्श करुन पळून जाण्याचा प्रयत्न करतो. यावेळी मानसीने धाडस करुन त्या मुलाचा हात पकडते आणि त्याच्या जोरदार कानशिलात लगावते. यानंतर मानसी त्याला प्रॉब्लेम काय असे विचारते. तू जे काही केले आहेस, ते कॅमेऱ्यात रेकॉर्ड झाले आहे, असेही त्याला सांगते. यानंतर तो मुलगा तिला सॉरी सॉरी बोलत वरच्या मजल्यावर जातो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २९ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com




# मैत्रेय संस्थेची उह्लासनगर शाळेत मदत



गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी मुंबई येथील मैत्रेय संस्थेने नुकतीच उह्लासनगर येथील जागृती ठाकूर शाळेत मदत पोहचवली.यात दोन नवीन ऑफिस कपाटे, दोन टेबल्स खुर्च्या, १५ पंखे तसेच एक संगणक अशी जवळपास ७५ हजार रू किमतीचे समान भेट दिले. ही शाळा अत्यंत गरीब असून येथे इयत्ता पहिली ते दहावी अशी एकूण ३०० मुल शिकत आहेत.शाळेला या वस्तूंची अत्यंत गरज होती आणि मैत्रेय संस्थेने लक्षात घेऊन आम्हाला सहकार्य केल्यामुळे आम्ही आनंदित झालो असल्याचे मुख्याध्यापक रामाने यांनी सांगितले आणि संस्थेचे आभार मानले.याकामी मैत्रेय चे सुनील सरदेसाई यांनी पुढाकार घेतला होता.

# प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते यांच्या उपस्थितीत आर्यारवी एंटरटेनमेंटचा तिसरा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट पुरस्कार सोहळा संपन्न..!

मुंबई-परेल (प्रतिनिधी गुरुनाथ तिरपणकर) आर्यारवी एंटरटेनमेंटचा तिसरा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय लघुपट पुरस्कार वितरण सोहळा नुकताच शिशुविकास हॉल, बेस्ट वसाहत, राजकमल स्टुडिओ जवळ, परेल येथे सिने-नाट्य क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी सर्व विजेत्या लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले. प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते, दिग्दर्शक प्रदीप कबरे, सही रे सही नाटक फेम विनोदी अभिनेते जयराज नायर, प्रसिद्ध उद्योजक, समाजसेवक, अभिनेते खलील शिरगांवकर, शिर्के प्रतिष्ठानचे अँड सुनिल शिर्के, जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, प्रसिद्ध समाजसेविका सीमाताई पाटील, प्रसिद्ध विनोदी अभिनेते जयवंत भालेकर, कांचन पगारे आदी मान्यवर यांच्या हस्ते सोहळ्याचे दीपप्रज्वलन करून काश्मीरमधिल दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात गणेश स्तवनाने झाली. आर्यारवी एंटरटेनमेंटचे महेश्वर तेटांबे यांनी सोहळ्याचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक अनिल सुतार आणि प्रसिद्ध अभिनेता सागर सातपुते यांच्या अस्खलित सूत्रसंचालनाने प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. त्याचबरोबर सिनेसृष्टीत अलौकिक कार्य करणाऱ्या सर्वश्री अरुण होर्णेकर, मनोहर आचरेकर, निलांबरी खामकर, प्रदीप कबरे, लक्ष्मण गुरव आणि जयंत घाटे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते समाजभूषण, कलाभूषण, रंगकर्मी, समाजरत्न, युवा उद्योगरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले. निवेदक अनिल सुतार आणि सागर सातपुते यांनी लघुपट स्पर्धेचा निकाल जाहीर केला या निकालात कै.भिकाजी महादेव तेटांबे कै.मनोरमा भिकाजी तेटांबे यांच्या स्मरणार्थ "शाश्वत" (प्रथम विजेता) रोख रक्कम 25 हजार,सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, लोकनेते कै.विठ्ठलदादा खाडे आणि कै. सुनीताताई विठ्ठलराव खाडे यांच्या स्मरणार्थ "शूलेस" (द्वितीय विजेता) रोख रक्कम 15 हजार, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, "प्रपोजल" (तृतीय विजेता) रोख रक्कम 10 हजार, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह, "चटका" (उत्तेजनार्थ विजेता) रोख रक्कम 5 हजार,सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह तसेच इतर काही उत्तेजनार्थ आणि वैयक्तिक पारितोषिके कै.शामराव नारायण व्हटकर, कै. हौसाबाई शामराव व्हटकर, कै गीता आनंदा जाधव यांच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात आली. तसेच संस्थापक -अध्यक्ष श्री गुरुनाथ तिरपनकर यांच्या जनजागृती सेवा संस्थेच्या माध्यमातून, खलील शिरगांवकर, आणि अँड.सुनिल शिर्के, प्रसिद्ध अभिनेत्री लक्ष्मी मनिष गुप्ता यांच्या माध्यमातून अनेक पुरस्कार प्रदान करण्यात करण्यात आले.

# गौरव संतोष जाधव याची भारतीय सैन्य दलात भरती



कै. तुकाराम बाजीराव जाधव (वीट, ता. करमाळा, जि. सोलापूर) यांचे नातू आणि नंदकुमार तुकाराम जाधव यांचे पुतण्या, तसेच संतोष तुकाराम जाधव व रूपाली संतोष जाधव (सध्या मुक्काम ठाणे) यांचे सुपुत्र कुमार गौरव संतोष जाधव यांची नुकतीच भारतीय सैन्य दलात भरती झाली आहे. गौरवने लहानपणापासूनच देशसेवेची स्वप्ने उराशी बाळगली होती. या ध्येयप्राप्तीसाठी त्याने कठोर मेहनत, सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर भारतीय सैन्यात स्थान मिळवले आहे. गौरवच्या या यशाने संपूर्ण कुटुंबीयांचा आणि गावकऱ्यांचा अभिमान वाढवला आहे. गौरवने सैन्यात भरती होण्यासाठी घेतलेल्या अथक परिश्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याच्या जिद्दीला व चिकाटीला सलाम करत कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवाराने त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी गौरवच्या कुटुंबीयांनी सांगितले की, "गौरवने आपल्या मेहनतीने आणि देशप्रेमाच्या जिद्दीने हे यश मिळवले आहे. पुढील वाटचालीसाठी आम्ही त्याला भरभरून शुभेच्छा देतो." गौरवच्या यशामुळे संपूर्ण परिवार आणि परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्वत्र त्याचे अभिनंदन केले जात आहे.



कांदिवली पश्चिम येथील भाजपा वार्ड क्रमांक २० अध्यक्ष पदी संतोष जाधव यांची नुकतीच निवड झाली,त्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना भाजपा कार्यकर्त्यां सिमा राणे आणि व्योमा भट .

# कोण बनणार मुंबईचा नवीन पोलीस आयुक्त? स्पर्धेत लेडी सुपरकॉप चे नाव

मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर ३० एप्रिल रोजी निवृत्त होणार आहे. त्यांच्या निवृत्तीच्या पार्श्वभूमीवर मुंबईची जबाबदारी कोणाकडे जाणार याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. त्यांच्या उत्तराधिकारीपदासाठी आयपीएस अधिकारी सदानंद दाते, संजय कुमार वर्मा, बिपिनकुमार सिंह, रितेश कुमार यांच्या नावांची चर्चा आहे. सदानंद दाते सध्या एनआयएमध्ये व्यस्त असल्याने त्यांची नियुक्ती होण्याची शक्यता कमी आहे. रितेश कुमार, अमिताभ गुप्ता आणि संजीवकुमार सिंघलही शर्यतीत आहेत. विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांचाही विचार होत असल्याची चर्चा आहे. देवेन भारती मुंबईचे स्पेशल पोलीस कमिश्नर आहेत. मुंबईच्या इतिहासात हे पद प्रथमच निर्माण करण्यात आले आहे. नवीन पोलीस आयुक्ताच्या निवडीत वरिष्ठपदाच्या विचारासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती देवेन भारती यांची ओळख आहे. यापूर्वी 2014 ते 2019 या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना ते सर्वात पॉवरफूल अधिकारी होते. परंतु सध्या देवेन भारती यांच्यासाठी विशेष पद तयार केले असल्यामुळे त्यांची नियुक्ती होण्याची शक्यता कमी आहे. 'लेडी सुपरकॉप'चे नाव चर्चेत महिला अधिकारी म्हणून अर्चना त्यागी यांचे नाव चर्चेत आहे. 'लेडी सुपरकॉप' म्हणून 1993 बॅचच्या अधिकारी अर्चना त्यागी यांची ओळख आहे. अर्चना त्यागी मुंबई पोलीस आयुक्ताच्या शर्यतीत आघाडीवर आहेत. त्यांची 'लेडी सुपरकॉप' म्हणूनही ओळख पोलीस दलात आहे. बॉलिवूडमधील 'मर्दानी' हा चित्रपट त्यांच्यावरच आधारित होता. अभिनेत्री राणी मुखर्जीने पोलीस अधिकाऱ्याची भूमिका त्या चित्रपटात साकारली होती. सध्या त्या महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्पर्धेत 1990 बॅचचे आयपीएस अधिकारी संजय कुमार वर्मा यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे. ते एप्रिल 2028 मध्ये निवृत्त होणार आहे. त्यांनी 5 नोव्हेंबर ते 26 नोव्हेंबर दरम्यान राज्याचे पोलीस महासंचालक पद सांभाळले आहे. निवडणूक आयोगाने त्यांनी महासंचालक बनवले होते.

# मुंबईतील इलेक्ट्रॉनिक्स शोरूमच्या इमारतीत भीषण आग

मुंबईतील वांद्रे परिसरातील एका इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या शोरूमच्या इमारतीत मंगळवारी पहाटे भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ३५ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. आग विझवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आगीमुळे मोठ्या प्रमाणात धूर परिसरात पोहचला आहे. आगीत कोणीही जखमी झाल्याचे वृत्त अद्याप नाही. ही आग ती भीषण होती की, आगीत मॉलमध्ये असलेले शेकडो दुकाने जळून खाक झाली. मंगळवारी पहाटे वांद्रे पश्चिम परिसरातील लिंकिंग रोडवरील एका बहुमजली इमारतीत आग लागली. वांद्रे येथे असलेल्या लिंक स्केअर मालमधील क्रोमा शोरुमला ही आग लागली. बेसमेंटमध्ये ही आग लागल्यानंतर ती तिसऱ्या मजल्यापर्यंत पोहचली आहे. आगीमुळे या भागातील रस्ते बंद करण्यात आले आहे. सकाळचे आठ वाजले तरी आग नियंत्रणात येत नाही. यामुळे आग विझवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून रोबोटिक मशीनचा वापर केला जात आहे. घटनास्थळी शेकडो अग्निशामन दलाच्या कर्मचाऱ्यासह एनडीआरची टीम देखील दाखल झाली आहे. अग्निशमन दलाची यंत्रणा कर्मचाऱ्यांना वापरता येत नसल्याने आग मोठ्या प्रमाणात पसरल्याचा आरोप दुकानदारांनी केला आहे. सध्या आपला माल वाचवण्यासाठी दुकानदार जीवाची बाजी लावत आहे. घटनास्थळी उपस्थित असलेल्या पोलिस पथक आणि अग्निशमन दलाच्या ३५ गाड्या आणि इतर अग्निशमन दलाच्या गाड्या आग विझवण्याचे प्रयत्न करत आहेत. रोबोटीक मशीन आणली गेली आहे. ज्या ठिकाणी अग्नीशमन दल पोहचू शकत नाही, त्याठिकाणी रोबोटीक मशीन वापरल्या जात आहेत. वांद्रे भागातील लिंकिंग परिसरात ही आग लागली.

# प्रधानमंत्री आवास योजनेतून नव्याने घरकूल मिळविण्यासाठी सेल्फ सर्व्हे करून घ्या-आ.क्षीरसागर

बीड, दि.२८ (प्रतिनिधी) :- पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिता सध्या ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करणे चालू आहे. बीड मतदारसंघातील ज्या नागरिकांना घर नाही अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३० एप्रिल पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी जिल्ह्याभरात सध्या सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकतात. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी, नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे प देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून पवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा. काही अडचण असल्यास संपर्क साधा घरकुल सेल्फ सर्व्हेच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अडचण असल्यास आपल्या ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक अडचण असल्यास १८००-११०-१११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क करावा. यासोबतच प्रशासनासंबंधित काही तक्रार असल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे

# स्वप्न की सत्य

तुझ्या प्रेमाची चाहूल भुरळ मनी
का अशी हुरहुर राजसा क्षणोक्षणी
गर्द धुक्याची झालर ओल्या चांदराती
तुझ्या श्वासांच्या मिठीत दर्वाला भरती ॥१॥

निःशब्द शहारा क्षणोक्षणी बोलतो
नजरेच्या कटाक्षाने उर घायाळ होतो
बोलकी मिठी अन् निःशब्द सहवास
भरतो उरी मम गात्रोगात्री सुवास ॥२॥

मिठीत तुझ्या सारे जग विसरते
दुःख विसरूनी तुला हृदयी साठवते
मनाच्या रथाचे वारू सैरभैर उधळते
स्वप्न की सत्य मला न उमगते ॥३॥

**आशारेखा**
**९२८४०४६०२३ _**

# माजलगाव तालुक्यातील सावरगाव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पहिल्यांदा जयंती साजरी करणारे मराठा समाजातील स्वः दामोधर अण्णा

माजलगाव दि २७ (बातमीदार) तालुक्यातील सावरगाव येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पहिल्यांदा जयंती साजरी करण्याची सुरुवात मराठा समाजातील स्वः दामोधर रंगोबा जगताप यांनी केली. त्यांच्या कार्याला साथ, गावचे पोलिस पाटील स्वः अर्जुनराव जगताप यांनी दिली. या दोन्ही जगताप कुटुंबात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज पण उत्साहात जयंती साजरी केली जाते.

दामोदर जगताप यांना सर्व जण अण्णा म्हणून संबोध म्हणून ते सर्वांचे अण्णा झाले होते बाबासाहेब यांचे विचार त्यांच्या मनावर खोल पर्यंत रुजले होते म्हणून अण्णांना बाबासाहेब हे समजले होते डॉ बाबासाहेबांच्या विचाराने संपूर्ण मानव जातीचं कल्याण करणं शक्य आहे त्या मुळे ते डॉ बाबासाहेबांची जयंती साजरी करत असत आता त्यांचा मुलगा राजेंद्र जगताप आणि पोलिस पाटील यांचे चिरंजीव अभिमन्यु जगताप यांनी पुढे सुरू ठेवला आहे. काल दि २७ रविवार रोजी सावरगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली आहे. या प्रसंगी दोन्ही जगताप कुटुंबातील चिरंजीव यांनी प्रत्यक्ष भेट देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली.

१९७२ साली संपूर्ण देश दुष्काळात होरपळत होता. लोकांच्या खाण्या पिण्याची तारांबळ उडत होती. खायला अन्न, पिण्यास पाणी मिळने कठीण होते. अशा परिस्थिती सामाजिक कार्यकर्ते दामोधर जगताप



यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पहिल्यांदा जयंती गावात साजरी केली. आणि आयुष्य भर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आणि जीवन जगण्याचा ग्रंथ म्हणून संविधान डोळ्या समोर ठेवून जीवन व्यतीत केले जाती वादाच्या कार्यकाळात देखील स्वः दामोधर जगताप हे कधी डगमगले नाहीत, कारण त्यांना बाबासाहेब समजले होते समाजातील लोक काय म्हणतील याकडे त्यांनी अजिबात लक्ष दिले नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर पुढे चालत राहिले. जे योग्य कार्य आहे ते करत राहिले. म्हणून आज सुजलाम् सुफलाम् कुटुंब झालेचे त्यांच्या कडून बोलले जायचे. जयंतीच्या प्रसंगी स्वः दामोधर जगताप यांच्या कार्याचा सुगंध आल्या शिवाय राहत नाही.

या जयंती च्या सकाळच्या सत्रात निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण स्वः दामोधर जगताप यांचे चिरंजीव मा. राजेंद्र जगताप ( सर) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परमेश्वर नाईकनवरे, अशोक नाईकनवरे, अजिंक्य जगताप, अशोक कांबळे, भीमराव कुव्हारे, प्रा. धम्मानंद बोराडे, अमोल फंदे, प्रल्हाद बोराडे, बाबासाहेब बोराडे, सहास बोराडे. इत्यादीच्या उपस्थितीत मान्यवरानी बुद्ध वंदना घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे समोर नतमस्तक होऊन मानवंदना दिली.

आज अण्णा हयात नाहीत पण वडिलांच्या कार्याचा वसा पुढे चालू ठेवणारे राजेंद्र जगताप यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न.

चौकट :
महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या जयंती निमित्त समाज बांधवांकडून मानवंदना.

# मुंबईत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चे भव्य आयोजन; प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्घाटनासाठी उपस्थित राहणार- उद्योग मंत्री उदय सामंत

मुंबई, दि. २८ : मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे २०२५ पर्यंत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे १ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी 1 मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही सहभाग राहणार आहे. उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर हे मुंबईला म्हटले जाते. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी याच महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट सुरू केले. त्यामुळे मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई ही देशात अग्रगण्य शहर आहे. त्याचबरोबर, गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ही एक नंबरला आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई एक नंबरला राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा उद्देश आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक व पर्यटन संस्कृती आणि ज्या काही महाराष्ट्राच्या परंपरा आहेत, त्या जागतिक पातळीवर जाव्यात, यासाठी मुंबई शहराची निवड केंद्र शासनाने केली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले उद्योग मंत्री सामंत यांनी सांगितले की, या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित



राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. "हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक व पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्याची संधी आहे. या भव्य आयोजनासाठी राज्य शासनाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे," असे आवाहनही उदय सामंत यांनी केले.

# माझी इच्छा लवकरच...पालकमंत्रिपदावर भरत गोगावलेंचे सूचक विधान,

देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारची स्थापना होऊन चार महिन्यांपेक्षा अधिक काळ लोटला तरी अद्याप रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटलेला नाही. रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे तटकरे कुटुंब आणि शिवसेना पक्षाचे मातब्बर नेते भरत गोगावले या पदासाठी अडून बसलेले आहेत. दरम्यान, आता भरत गोगावले यांनी पालकमंत्रिपदावर पुन्हा एकदा महत्त्वाचं भाष्य केलंय. त्यांच्या या विधानानंतर काहीही झालं तरी भरत गोगावले (Bharat Gogawale) माघार घेण्यास तयार नसल्याचा अर्थ काढला जातोय. रायगडच्या पालकमंत्रिपदाचा वाद काय? महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांना पालकमंत्री मिळालेले आहेत. पण चार महिन्यांनंतरही रायगड जिल्हा हा पालकमंत्र्यांविनाच आहे. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे नेते भरत गोगावले हे पालकमंत्रिपदासाठी अडून बसलेले आहेत. काहीही झालं तरी मलाच पालकमंत्रिपद मिळालं पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे. तर दुसरीकडे रायगड जिल्ह्यातीलच नेत्या आदिती तटकरे यादेखील पालकमंत्रिपद सोडण्यास तयार नाहीत. अदिती तटकरे यांच्या गळ्यात पालकमंत्रिपदाची माळ पडावी यासाठी त्यांचे वडील सुनिल तटकरे आपली पूर्ण ताकत लावत आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्याचा पालकमंत्रिपदाचा तिढा जास्तच वाढला आहे. अमित शाहांच्या दौऱ्यानंतरही स्थिती जैसे थे काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शाहा रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी सुनिल तटकरे यांनी पालकमंत्रिपदासाठी शाहांकडे शब्द टाकल्याचे म्हटले जाते. त्यानंतर गोगावले यांचा पत्ता कट होणार का? असा प्रश्न उपस्थित झाला होता. पण गोगावले यांनी केलेल्या ताज्या विधानानंतर अजूनही खेळ संपलेला नाही, असाच संदेश सर्वांना गेल्याचं राजकीय वर्तुळात म्हटलं जातंय. भरत गोगावले नेमकं काय म्हणाले? भरत गोगावले हे पुण्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी वेगवेगळ्या मुद्द्यांवर भाष्य केलं. पालकमंत्रिपदावरही ते बोलले. "माझी पालकमंत्रिपदाची इच्छा लवकरच पूर्ण होईल. वाघेश्वरकडे आल्यानंतर बऱ्याचशा इच्छा पूर्ण होतात. माझी पालकमंत्रिदाची इच्छा पण पूर्ण होईल," असे भरत गोगावले म्हणाले. दरम्यान आता गोगावले यांच्या विधानानंतर वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्याबाबत नेमका काय निर्णय होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र पोलिसांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य अंगलट, शिवसेना आमदारावर गुन्हा दाखल

महाराष्ट्र पोलिसांसारखे अकार्यक्षम डिपार्टमेंट जगात कुठेही नाही. पोलिसांनी जर 50 लाख पकडले तर ते 50 हजार दाखवतात, असे आक्षेपार्ह विधान शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी केले होते. यानंतर संजय गायकवाड सर्व बाजूंनी अडचणीत आले आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच शिवसेना नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्यांना समज दिल्याचे सूत्रांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आपण एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे म्हटले होते. पोलिसांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी आ. संजय गायकवाड गुन्हा दाखल करण्यात आला. या वक्तव्यानंतर आमदार संजय गायकवाड यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. संजय गायकवाड म्हणाले, गुन्हा दाखल झाला आहे तर त्याला मी सामोरे जाईल. मी केलेल्या वक्तव्यात महाराष्ट्र पोलिसांचा चुकून उल्लेख झाला. मला ते स्थानिक पोलिसांबद्दल बोलायचे होते. महाराष्ट्र पोलिसांचे




धाडस, कर्तृत्व विसरता येणार नाही. ज्या चांगल्या अधिकाऱ्यांना माझ्या वक्तव्याबद्दल मनस्ताप झाला असेल, त्यांची मी दिलगिरी व्यक्त करत आहे. मात्र, काही लोकांमुळे पोलीस बदनाम झाले आहे. महाराष्ट्र पोलिसांबद्दल बोललेले शब्द मी मागे घेत आहे. एकनाथ शिंदे पण आमचेच आहे. तसेच देवेन्द्रजी आमचे नेते आहे. ते मला याबद्दल बोलले असते तरी काही अडचण नाही. त्यांना बोलण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र पोलिसांबद्दल केलेल्या वक्तव्याबद्दल मी माझे शब्द मागे घेतो. या वक्तव्यावर आपण विनम्रपणे दिलगिरी व्यक्त करत आहे, असेही आमदार गायकवाड यांनी म्हटले आहे. दरम्यान, शिवसेना नेते उदय सामंत यांनी संजय गायकवाड यांच्या वक्तव्यावरुन प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, गायकवाड यांच्या वक्तव्याशी आम्ही कोणीही सहमत नाही. मुंबई आणि महाराष्ट्र पोलिसांची एक वेगळी प्रतिमा आहे. देशात महाराष्ट्र पोलिसांनी उत्कृष्ट काम करून दाखवले. संजय गायकवाड यांनी केलेल्या विधानाबद्दल आम्ही त्यांच्याशी बोलू, असे उदय सामंत यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पद्धतीचे वक्तव्य वारंवार चालणार नाही. मी शिंदे साहेबांकडे तक्रार केली.

## वाल्मिक कराडला पॅनिक अटॅक आल्यानंतर अंजली दमानियांची मोठी मागणी, म्हणाल्या त्या तुरुंगात

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडला तुरुंगात पॅनिक अटॅक येत असल्याचे वृत्त समोर आले होते. यानंतर वाल्मिक कराडची तपासणी करण्यात आली. त्याला उपचारासाठी दाखल करण्यात आले. यानंतर त्याच्या सर्व चाचण्या करण्यात आल्या असून, त्याचे सर्व वैद्यकीय रिपोर्ट नॉर्मल आले आहेत. त्यामुळे आता पुन्हा त्याची रवानगी बीड मध्यवर्ती कारागृहात करण्यात येणार आहे. आता यावरुन सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी निशाणा साधला आहे. वाल्मिक कराडला अर्थरोड तुरुंगात हलवा, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली आहे. अंजली दमानिया यांनी नुकतंच टीव्ही ९ मराठीशी संवाद साधला. यावेळी त्यांनी वाल्मिक कराडच्या प्रकृती बिघडण्याबद्दल भाष्य केले. त्यात त्यांनी मोठी मागणी केली. "मी पहिल्या दिवसापासून सांगते की वाल्मिक कराडला अर्थ रोड तुरुंगामध्ये शिफ्ट करा. पण माझं कुणीही ऐकत नाही. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे कुठेतरी त्याला वाचवण्याचा प्रयत्न होतोय का असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. वारंवार त्याची प्रकृती बिघडते. वारंवार आणि त्याचे सगळे रिपोर्ट्स नॉर्मल येत असून सुद्धा त्याच्यावर कुठेतरी स्पेशल ट्रीटमेंट देण्याचा प्रयत्न होतोय का आणि तुरुंगात न ठेवता त्याला इतरत्र हलवण्याचा हा सगळा कट आहे का असं आमचा संशय आहे", असे अंजली दमानिया म्हणाल्या. सरकारने लक्ष देण्याची गरज "धनंजय देशमुख यांनी सुद्धा म्हटलेलं आहे की या प्रकरणांमध्ये सरकारने लक्ष द्यायची गरज आहे. खरंतर गृहमंत्रालयाला पत्र लिहिण्याची सध्या तरी काय आवश्यकता आहे असं वाटत नाही. रणजीत कासले हा माणूस जरा वेगळा धाटणीचा आहे. त्यामुळे त्याच्यावर मी कुठलेही भाष्य करणार नाही. पण माझं म्हणणं एवढंच आहे की वारंवार मागणी करून सुद्धा वाल्मिक कराड याला त्याच तुरुंगामध्ये का ठेवलं जातं, असं त्या तुरुंगामध्ये काय आहे की त्याला त्या तुरुंगामध्ये ठेवण्याचा गरज सरकारला वाटते", असा सवालही अंजली दमानिया यांनी केला. सध्या प्रकृती स्थिर दरम्यान वाल्मिक कराडला काल दुपारच्या वेळी अस्वस्थ वाटू लागलं. त्याची प्रकृती अचानक बिघडली. कारागृहात गेल्यापासून कराडच्या प्रकृतीच्या तक्रारी वाढल्या आहेत. डॉक्टरांनी त्याची तपासणी केली. त्याला पॅनिक अटॅक आल्याचे निदान करण्यात आले. डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार केले. त्याच्यावर औषधोपचार करण्यात आले. सध्या त्याची प्रकृती स्थिर आहे.

## गोरेगाव मध्ये सौ.स्मिता आपटे लिखित संक कॉस्ट फॅलसीकथा संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन.




भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. मुंबई मधील गोरेगाव उपनगरात सौ.स्मिता आपटे लिखित संक कॉस्ट फॅलसी या कथा संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे लेखिका, निवेदिका,नाट्यकलाकार सौ.स्मिता आपटे यांनी आमचे मुंबई प्रतिनिधी भारत कवितके यांना कळविले आहे.रविवार दिनांक ४ मे २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता केशव गोरे स्मारक ट्रस्ट गोरेगाव पश्चिम या ठिकाणी भरारी प्रकाशन निर्मित संक कॉस्ट फॅलसी या कथा संग्रहाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी अध्यक्ष व प्रकाशन हस्ते सुप्रसिद्ध नेत्र तज्ज्ञ पद्मश्री डॉ.तात्यासाहेब लहाने, प्रमुख वक्त्या निर्मिती, दिग्दर्शिका कांचन अधिकारी, विशेष अतिथी कवी, गीतकार प्रसाद कुलकर्णी आणि विशेष अतिथी डॉ.महेश अभ्यंकर ( ग्रंथ तुमच्या दारी), सुहास कबरे(राजहंस प्रतिष्ठान), महादेव गोविंद रानडे (अध्यक्ष सुविद्यालय) आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.या कथा संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यास साहित्य प्रेमी रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन सौ.स्मिता आपटे यांनी केले आहे.

## कांदिवली भाजपा वार्ड क्रमांक 20 अध्यक्षपदी संतोष जाधव यांची नियुक्ती.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम कांदिवली भाजपा वार्ड क्रमांक २० च्या अध्यक्ष पदी संतोष जाधव यांची नुकतीच निवड झाली आहे.संतोष जाधव हे गेली २५ वर्ष भाजपा मध्ये कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत, अत्यंत प्रामाणिक, मनमिळाऊ, कार्यकर्ते मध्ये व विभागांमध्ये लोकप्रिय असलेले,दिलेले काम प्रामाणिकपणे व चोखपणे पार पाडणे, जनसंपर्क दांडगा असलेले, भाजपा च्या प्रत्येक कार्यात अग्रेसर असलेले संतोष जाधव यांची वार्ड क्रमांक २० च्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आल्याने कांदिवली चारकोप विभागातून भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते.महान नेत्यांच्या जयंत्या, पुण्यतिथी, मोर्चे, आंदोलने, सत्कार समारंभ, विविध शिबीरे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय कार्यक्रमात संतोष जाधव नेहमीच पुढाकार घेऊन आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवित असतात.त्यांनी आता पर्यंत भाजपामध्ये केलेल्या चांगल्या कामाची पावती म्हणूनच त्यांना वार्ड क्रमांक २० च्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.संतोष जाधव हे पूर्व मंडळ अध्यक्ष व पूर्व नगरसेवक बाळा तावडे यांच्या कार्यालयात जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत असतात.

## म्हणून दहशतवाद्यांनी धर्म विचारला, पहलगाम हल्ल्यावर अबू आझमी यांचं मोठं वक्तयव्य

पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्यात 26 जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. या हल्ल्यावर आता पहिल्यांदाच सपा नेते अबू आझमी यांनी प्रतिक्रिया देताना मोठं वक्तव्य केलं आहे. काश्मीरच्या पहलगाममध्ये जे झालं त्यावर सगळेच मुस्लीम ओरडून सांगत आहेत, आम्ही सरकार बरोबर आहोत. सरकारने या दहशतवाद्यांविरोधात कठोर ॲक्शन घ्यावी अशी ते मागणी करत असल्याचं आझमी यांनी यावेळी म्हटलं आहे. नेमकं काय म्हणाले आझमी? काश्मीरच्या पहलगाममध्ये जे झालं त्यावर सगळेच मुस्लीम ओरडून सांगत आहेत, आम्ही सरकार बरोबर आहोत. सरकारने या दहशतवाद्यांविरोधात कठोर ॲक्शन घ्यावी अशी ते मागणी करत आहेत. दहशतवाद्यांनी धर्म विचारून गोळ्या घातल्या, कारण त्यांना हे चांगलं माहीत होतं की असं केलं तर भारतामध्ये हिंदू -मुस्लीम होईल. ज्या ठिकाणी हल्ला झाला, तेथील मुस्लीम बांधव बचावासाठी धावून आले, मदत कर्य केलं. मात्र भारतातील मुसलमान लोकांना अशी वागणू का दिली जात आहे? असा सवाल यावेळी आझमी यांनी उपस्थि केला आहे. ज्यांनी हिंदूंना मारले त्यांना मारा आम्हाला का त्रास देत आहात? मुंबईच्या दादरसह भारतात अनेक ठिकाणी मुस्लीम लोकांना मारहाण केली जात आहे. सगळ्यात मोठी बाब म्हणजे निवडून आलेले आमदार देखील अशी वक्तव्य करत आहेत. संविधानाची शपथ घेऊन नितेश राणे रत्नागिरीत जाऊन हनुमान चालीसा वाचायला सांगत आहेत. हिंदू मुस्लीम करत आहेत, मी पंतप्रधान , सरकार, मोहन भागवत यांच्यासह सर्वांना विनंती करतो की जातीयवाद होऊ देऊ नका. यासंदर्भात एक पत्रक काढून आदेश देण्याची गरज आहे. सरकार ज्या गोष्टी आणत आहेत, त्या सगळ्या मुस्लिम विरोधात आहेत. वक्फ बोर्ड कायदा तोही मुसलमान विरोधात आहे, तो आम्हाला नको आहे. सगळे हिंदू मुस्लिम यांना लढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असा आरोपही यावेळी आझमी यांनी केला आहे. मी दोन वेळा नितेश राणे यांच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांना भेटलो.

# उद्धव ठाकरेंना मुंबईत सर्वात मोठा धक्का, बाळासाहेबांचा विश्वासू शिवसैनिक शिंदे गटात!

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होऊ शकते. हीच बाब लक्षात घेऊन राजकीय पक्ष आपले डावपेच आखत आहेत. मुंबई महानगरपालिका जिंकण्यासाठी शिवसेनेचे दोन्ही गट पूर्ण ताकदीने कामाला लागले आहेत. असे असतानाच आता उद्धव ठाकरे यांना मुंबईत मोठा धक्का बसला आहे. महापालिका निवडणूक तोंडावर असताना इथे दिवंगत नेते बाळासाहेब ठाकरे यांचे कधीकाळचे विश्वासू आणि मुंबईचे माजी महापौर दत्ता दळवी यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुंबई पालिकेवर झेंडा रोवण्यासाठी इतर पक्षांतील महत्त्वाच्या नेत्यांना आपापल्या पक्षात घेतले जात आहे. असे असतानाच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शह देण्यासाठी मुंबईत मोठी खेळी खेळली आहे. त्यांनी कधीकाळी बाळासाहेबांच्या तालमीत राजकारणाचं बाळकडू घेतलेल्या दत्ता साळवी यांना शिंदे गटात ओढलं आहे. दत्ता दळवी हे मुंबईचे महापौर राहिलेले असून त्यांची ईशान्य मुंबईत मोठी ताकद आहे. त्यांच्या येण्याने एकनाथ शिंदे यांची मुंबईतील ताकद वाढल्याचं राजकीय जाणकार सांगत आहेत. स्वतःला काही घेण्यासाठी नव्हे तर देण्यासाठी आलो शिंदे यांच्या पक्षात




प्रवेश केल्यानंतर दत्ता दळवी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खऱ्या शिवसेनेत प्रवेश घेतला आहे. मला आनंद वाटतोय. एकनाथ शिंदे यांच्यासोबत येताना मनात कोणतीही शंका-कुशंका किंवा भावना घेऊन आलेलो नाही. मी फक्त जनतेच्या समस्यांचे ओझ खांद्यावर घेऊन आलोय. आमचे प्रश्न सोडवण्यासाठी एकनाथ शिंदे नक्की प्रयत्न करतील, याचा मला विश्वास आहे, अशी प्रतिक्रिया दत्ता दळवी यांनी दिली. तसेच, महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचा प्रयत्न प्रलंबित होता, ते काम चालू झाल आहे. विक्रोळीचे अनेक प्रश्न आहेत. स्वतःला काही घेण्यासाठी नव्हे तर देण्यासाठी आलो आहे, अशा भावनाही त्यांनी व्यक्त केल्या. कोण आहेत दत्ता दळवी? दत्ता दळवी हे बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित झालेले कडवट शिवसैनिक म्हणून ओळखले जातात. बाळासाहेब ठाकरे यांचे निष्ठावंत म्हणूनही त्यांची मुंबईच्या राजकारणात ओळख आहे. ते नोव्हेंबर 2023 मध्ये एका आगळ्यावेगळ्या कारणामुळे चर्चेत आले होते. त्यांनी एका कार्यक्रमात बोलताना जाहीर भाषणात एकनाथ शिंदे यांच्याविषयी आक्षेपार्ह शब्दांचा वापर केला होता. त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शिवीगाळ केली होती. त्यानंतर दळवी यांच्यावर अटकेची कारवाई झाली होती. यावेळी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने दळवी यांना पूर्ण ताकदीने पाठिंबा दिला होता. मुंबई पालिका निवडणुकीत पुढे काय होणार? दत्ता दळवी हे 2005 ते 2007 या काळात मुंबईचे महापौर राहिलेले


This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com